**कार्यकारी अभियंता(पापु)** अमृत योजनेची माहिती सविस्तर सादर केली आहे. अमृत योजनेच्या कामाची ऑर्डर दिनांक 11.8.2017 ला देण्यात आली आहे. या कामाची 15 महीण्याची मुदत होती. महाराष्ट्र शासनाने अमृत योजनेच्या कामाना ऑगस्ट 2019 पर्यत मुदत वाढ दिलेली आहे. कंत्राटदारास महापालिकेने मार्च 2019 अखेर पर्यत काम करण्यास सांगीतले आहे. या कामामध्ये 132 किमी लाईन टाकावयाची होती आणि आतापर्यत 106 किमी लाईन टाकण्यात आली आहे. 132 किमी लाईनचा पुरवठा कंत्राटदाराने केलेला आहे. यापैकी 60 किमी लाईनची टेस्टींग केलेली असुन त्या ठिकाणी पाणी पुरवठा हा सुरळीत होत आहे. उर्वरीत 46 किमी लाईनचे टेस्टींगचे काम चालू आहे निविदेत केवळ 77 क्रास कनेक्शन होते परंतू प्रत्यक्षात 150 क्रास कनेक्शन झालेले आहे. कंत्राटदाराचे आतापर्यत 80 टक्के काम पुर्ण केले आहे आता केवळ 20 टक्के काम करावयाचे शिल्लक राहीले आहे. 40 किमीटरचे क्रास कनेक्शन करावयाचे शिल्लक राहीले आहे. प्रभाग वाईज सुध्दा यादी आहे कोणत्या ठिकाणी काम झाले आहे, याची सर्व माहिती माझ्याकडे आहे. आम्ही मार्च पर्यत पुर्ण काम करुन घेणार आहोत.

**अब्दुल शमीम** अमृत योजनेची लाईन ही गरीब वसाहतीत टाकलेली आहे. नळ जोडणी घेण्यासाठी केवळ 500 रुपयात जोडणी करण्यात यावी. ही अभय योजना सुरु करावी. त्यामुळे आपल्या उत्पन्नात भर पडले. एक ठराव पास करण्यात यावा. ज्या वसाहतीत लाईन टाकलेली आहे ती अंत्यत गरीब लोकांची वस्ती आहे. हा ठराव याच सभेत पारीत करुन कायम करण्यात येते. अन्डवॉन्सची रक्कम

घेण्यात येवू नये. ज्यांना घर क्रमांक दिला नाही त्यास घर पटटी मागण्यात येवू नये. एक शपथ पत्र घेवून त्यास नळ जोडणी करुन दयावी.

**सभापती** नविन नळ जोडणीची एक अभय योजना सुरु करावी. 500 रुपये भरुन नळ कनेक्शन दयावे.

**सभापती** अमृत योजने अंतर्गत कामाची सविस्तर माहिती प्राप्त झालेली असुन त्यानुसार सदर योजने अंतर्गत काम करणा-या श्री डी. एम. मुरकूटे, कंत्राटदार हे विहित मुदतीत काम करीत नसल्याने सदर कंत्राटदाराचे काम रद्द करुन दुस-या कंत्राटदारा मार्फत कामे करुन घेण्यात यावे. तसेच शहरातील गोरगोरीब नागरीकांना अमृत योतने अंतर्गत त्यांच्या भागात पाण्याची पाईप लाईन टाकण्यात आलेली असुन सदर पाईप लाईनवर मालमत्ता धारक हे नळ कनेक्शनचे चार्जेस जास्त असल्याने घेण्यास तयार नाही त्यामुळे झोपडपट्टी भागातील मालमत्ता धारकां मार्फत कर आकार पावती प्राप्त करणे अथवा त्यांच्याकडुन 100/- रुपये बॉन्डवर सदरचे नळ कनेक्शन रुपये 500/- मध्ये देण्यास मान्यता देण्यात येते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो. नियमानुसार आयुक्तांनी पुढील वैधानिक कार्यवाही करावी.

**ठराव क्रं. 120** **ठराव**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्यीत अमृत योजनेचे काम चालु असुन सदर योजनेतुन अद्याप पर्यंत कोण कोणते काम करण्यात आली व कोणकोणते काम शिल्लक आहे त्याची सविस्तर माहिती लेखी स्वरुपात देण्यात आलेली आहे.

तथापि अमृत योजने अंतर्गत काम करणा-या श्री डी. एम. मुरकूटे कंत्राटदार हे विहित मुदतीत काम करीत नसल्याने सदर कंत्राटदारास देण्यात आलेले काम रद्द करुन शिल्लक असलेले काम दुस-या कंत्राटदारा मार्फत जलद गतीने करुन घेण्यास मान्यता देण्यात येते.

तसेच शहरात अमृत योजने अंतर्गत पाण्याची पाईप लाईन टाकण्यात आलेली असुन कांही भागात मोलमजुरी, गोरगरीब नागरीकांना नळ कनेक्शन घेण्यासाठी जास्तीचे शुल्क असल्याने ते घेण्यास तयार नाही त्यामुळे शहरातील मोलमजुरी, गोरगरीब नागरीकांना त्यांची कर आकारणी पावती प्राप्त करुन घेणे तसेच ज्यांच्याकडे कर पावती नसेल अशां मालमत्ता धारकां मार्फत रुपये 100/- बॉन्ड घेवुन तात्काळ नळ कनेक्शन रुपये 500/- मध्ये देण्यास हि मनपा स्थायी समितीची सभा सर्वानुमते मान्यता देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो. नियमानुसार आयुक्तांनी पुढील वैधानिक कार्यवाही करावी.

**विषय क्रं. 05** **प्रस्ताव**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्यीत प्रभाग क्रं. 12 मध्ये रस्त्यांचे, नाली-नालेची साफसफाई होत नसल्यामुळे नागरीकांचे आरोग्यास धोका निर्माण झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी महानगरपालिकेची राहील. त्यामुळे प्रभाग क्रं. 12 मधील स्वच्छते बाबतीतची खालील प्रमाणे माहिती देण्यात यावी.

1. प्र.क्रं. 12 रस्ते साफसफाई करण्यासाठी एकूण स्त्री मजुरची संख्या किती आहे
2. प्र.क्रं. 12 मधील नाली व नाले साफसफाई करण्यासाठी पुरुष मजुरांची संख्या किती आहे
3. प्र.क्रं. 12 मध्ये सार्वत्रिक निवडणुक 2017 नंतर माहिती देई पर्यंत RNB या कंत्राटारा मार्फत दररोज व मानेवारी किती टन कचरा उचलण्यात येते त्याची माहिती देणे बाबत
4. प्र.क्रं. 12 मध्ये कचरा उचलण्यासाठी घंटा गाडी, रिक्षा, अप, ट्रॅक्टर, टेम्पो किती आहे व सदरील वाहनांवर वाहनचालकासह मजुरांची संख्या किती आहे.
5. प्र.क्रं. 12 मध्ये मनपा सार्वत्रीक निवडणुक पुर्वी A TO Z या कंत्राटदारा मार्फत दररोज व मानेवारी किती कचरा उचलण्यात येत होता त्याची माहिती देण्यतायावी

करिता वरील प्रमाणे माहिती येत्या मनपा स्थायी समितीच्या सभेसमोर लेखी स्वरुपात देवुन त्यावर निर्णय घेण्यास हि मनपा स्थायी समितीची सभा सर्वानुमते मान्यता देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**सुचक** :- अ. रशीद अ. गणी, **अनुमोदक** :- फारुख हुसेन, राजेश यन्नम, म. मसुद अहेमद खान

**<u>प्रशासकिय अहवाल</u>**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्यतील प्र.क्रं. 12 अंतर्गत रस्त्यांची व नाले साफसफाईसाठी आवश्यक मनुष्यबळ व यंत्रसामुग्री बाबतची माहिती संबंधीत क्षेत्रीय कार्यालय क्रं. 05 इतवारा चे क्षेत्रीय अधिकारी व संबंधीत स्वच्छता निरिक्षक यांचेकडून प्राप्त करुन खालील प्रमाणे सादर करण्यात येत आहे.

| अ. क्रं. | रस्ते सफाईचे स्त्री मजुर | | | नाली व नाले सफाई पुरुष मजुर | | | ट्रॅक्टर | | घंटा गाडी | | सायकल रिक्षा | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | कंत्राटी | मनपा | एकूण | कंत्राटी | मनपा | एकूण | संख्या | मजुर | संख्या | मजुर | संख्या | मजुर |
| 01 | 08 | 04 | 12 | 05 | 05 | 10 | 01 | 04 | 04 | 04 | 01 | 01 |

1) प्र.क्रं. 12 मध्ये रस्ते साफसफाई करण्यासाठी एकूण 12 स्त्री मजुरांची संख्या आहे.

2) प्र.क्रं. 12 मध्ये नाली व नाले साफसफाई करण्यासाठी एकूण 10 पुरुष मजुरांची संख्या आहे.

3) प्र.क्रं. 12 मध्ये कचरा उचलण्यासाठी लावण्यात आलेले वाहने खालील प्रमाणे आहे :-

1) घंटा गाडी / अप्पे संख्या :- 04, वाहन चालकासह मजुर-08

2) रिक्षा संख्या :- 01, मजुर-01

3) ट्रॅक्टर :- 01, चालकासह मजूर-05

4) टेम्पो :- निरंक

मुद्दा क्रामंक 03 व 05 ची माहिती खालील प्रमाणे सादर करण्यात येत आहे.

| अ.क्र. | महिना | क्षेत्रीय कार्यालय क्रं. 05 इतवारा चे R & B चे प्रती माह वजन (टन) | क्षेत्रीय कार्यालय क्रं. 01 ते 06 अंतर्गत R & B चे प्रती माह वजन (टन) | महिना | क्षेत्रीय कार्यालय क्रं. 01 ते 06 अंतर्गत A2Z चे प्रती माह वाजन (टन) |
|---|---|---|---|---|---|
| 01 | फेब्रुवारी-18 | 659.475 | 1942.545 | फेब्रुवारी-16 | 7908.400 |
| 02 | मार्च-18 | 2940.385 | 8298.70 | मार्च-16 | 7914.555 |
| 03 | एप्रिल-18 | 2860.925 | 9569.180 | एप्रिल-16 | 7795.840 |
| 04 | मे-18 | 3482.415 | 10480.255 | मे-16 | 8152.610 |
| 05 | जुन-18 | 3036.655 | 8396.720 | जुन-16 | 10878.58 |
| 06 | जुलै-18 | 2950.755 | 8417.780 | जुलै-16 | 9298.185 |
| 07 | ऑगस्ट-18 | 2887.305 | 8094.055 | ऑगस्ट-16 | 7050.120 |
| 08 | सप्टेंबर-18 | 2691.210 | 7773.130 | सप्टेंबर-16 | 6996.625 |
| 09 | ऑक्टोंबर-18 | 2818.885 | 8066.925 | ऑक्टोंबर-16 | 7675.310 |
| 10 | नोव्हेंबर-18 | 2687.250 | 7865.315 | नोव्हेंबर-16 | 6267.800 |
| 11 | डिसेंबर-18 | 2663.780 | 8075.735 | डिसेंबर-16 | 5933.395 |
| 12 | जानेवारी-19 | -- | -- | जानेवारी-17 | 6065.225 |
| 13 | फेब्रुवारी-19 | -- | -- | फेब्रुवारी-17 | 6006.610 |
| 14 | मार्च-19 | -- | -- | मार्च-17 | 5382.735 |

**अब्दुल रशिद** जो आमच्या प्रभागात एसआय दिला आहे तो काम करत नाही. त्याची बदली इतर ठिकाणी करुन त्याच्या जागी दुस-या काम करणा-या स्वच्छता निरीक्षकाची बदली करावी. ज्यांचे बांधकाम चालू त्या ठिकाणचे साहित्य उचलत असतो, नालीचा पडलेला गाळ उचलत नाही तो तसाच ठेवण्यात येतो.लेखी पत्र सुध्दा दिलेले आहे.

**भानुसिंग रावत** विरोधी पक्ष नेत्यांने जी गाडी धरली आहे त्या गाडी मध्ये दगड होते त्या कंत्राटदारावर काय कार्यवाही केली आहे. त्याला जास्तीत जास्त दंड लावावा.

**सहाय्यक आयुक्त (स्वच्छता)** ज्या गाडीमध्ये दगड होते त्या दगडाचे वजन केले तर 30 किलोच्या वजनाचे दगड होते त्यामुळे कंत्राटदारास रु. 25000/- दंड आकारलेला आहे.

**सभापती** कंत्राटदारास केवळ रु 25000/- दंड लावला आहे तो दंड अंत्यत कमी लावण्यात आला आहे त्यास जास्त प्रमाणात दंड लावणे आवश्यक होते. ही बाब विरोधी पक्ष नेता यांनी निर्देशनास आनुन दिली आहे परंतू विभागाने अशी कार्यवाही झाल्याचे कधी दिसुन आले नाही. यापुर्वी मी देखील काही फोटो काढले होते. सफाईचे पैसे त्यास वेळेवर मिळत आहेत इतर कामासाठी आपल्याकडे निधी नाही. सफाईचे पैसे दिले पाहीजे. परंतू त्यांनी सफाई योग्य रितीने केली पाहीजे. सफाईसाठी लेबर किती, ट्रक किती याची सविस्तर माहिती सर्व सदस्यांना दयावी. सफाई कर्मचारी टोपले नाहीत म्हणुन काम करीत नाहीत. ही सुध्दा माहिती दयावी.

**अब्दुल शमीम** रस्त्यावरील बांधकाम साहीत्य सध्या कोण उचलून नेत आहे याची माहिती दयावी.

**सहाय्यक आयुक्त (स्वच्छता)** रस्त्यावरील बांधकाम साहित्य उचलून नेण्याकरीता यापुर्वी दोन ट्रक्टर लावण्यात आले आहेत आता ते मागील दोन महीण्यापासुन बंद केले आहेत.

**अब्दुल रशिद** माझा प्रस्ताव असल्याने मला एका एका मुदयावर माहिती आवश्यक आहे. माझ्या प्रभागाअंतर्गतील काय स्थिती आहे याची माहिती मला लेखी देण्यात यावी. त्याची फेर तपासणी करुन ही बाब मा. आयुक्तांचे निर्देशनास आणुन देण्यात येईल. हजेरी पटावर जे लोक आहेत ते काम करीत नाहीत इतर लोक काम करीत असल्याचे दिसुन आले आहे.

**सहाय्यक आयुक्त (स्वच्छता)** हजरी पटावर कोणाची नांवे आहेत व कोणाकडून काम करुन घेण्यात येत आहे त्याची सर्व जबाबदारी ही त्या विभागाचे सहाय्यक आयुक्त व स्वच्छता निरीक्षक यांची आहे त्याची जबाबदारी माझी नाही.

**राजेश यन्नम** माझ्या वार्डातील नालीतील कचरा उचलला जात नाही. कित्येक दिवसापासुन रस्त्यावर सफाई होत नाही असे सांगत आहे तरीही त्याकडे लक्ष देण्यात येत नाही.

**अब्दुल रशिद** माझ्या प्रभागात सुध्दा माती उचलण्यात येते. त्यामुळे वजनात वाढ होत आहे सफाईचा कचरा उचलण्यात येत नाही.

**सहाय्यक आयुक्त (स्वच्छता)** एटुझेड कंपनी 31 मार्च 2017 ला बंद झाली होती. ही कंपनी 7908 मॅट्रीक टन कचरा उचलत होती. आरअन्डबी कंपनी ही फेब्रुवारी 2018 ला चालू झाली आणि त्या कंपनीने 1942 मॅट्रीक टन कचरा उललेला आहे. एटुझेड व आरअन्डबी या कंपनी किती कचरा उचलला याची माहिती दिली आहे. नैसर्गीक वाढ 10 टक्के जरी धरली तर एवढा कचरा उचलत आहे. सर्व गाडयांना जीपीएस लावलेले आहे. मागील तीन महीण्याचे रेकॉर्ड जतन करुन ठेवले आहे. कोणत्या वार्डात गाडी आली नाही याची सर्व माहिती कार्यालयात आहे.

**सभापती** या कंपनीमधील कचरा हा 400 मॅट्रीक टनचा फरक दिसुन आलेला आहे. यात मातीचा समावेश असल्याने त्याचे वजन वाढत आहे.

**अब्दुल रशिद** माझ्या प्रभागात किती कचरा उचलला याची माहिती दयावी. चार महीण्याचा आणि आताचे अवरेज कसे सेम येत आहे. कचरा कमी उचलण्यात आला पाहीजे. दररोज सारखाच कचरा कसा काय उचलला जावू शकते. यापुर्वीच्या कंत्राटदाराकडे गाडया कमी होत्या तरीही कचरा सारखाच उचलला गेला. हे अधिकारी कंत्राटदाराच्या फेवर मध्ये काम करीत आहे हा माझा आरोप आहे.हे महापालिकेचे काहीच विचार करीत नाहीत.

**राजेश यन्नम** महापालिकेचे किती कर्मचारी काम करीत आहेत याची माहिती लेखी स्वरुपात देण्यात यावी. हा अधिकारी फोन उचलत नाही. आमच्या वार्डात सफाई होत नाही त्यासाठी आता दोन ट्रक्टर ठेवण्यात यावे.

**सभापती** सदस्य जे आरोप करीत आहेत ते बरोबर आहेत. कंपनीस नालीतील मातीचा कचरा उचलावा लागेल. कंपनीस जर दगड उचलत असेल तर त्यास जास्तीत जास्त दंड आकारण्यात यावा. त्याच्या बाजूने प्रशासनाने काम करु नये. महापालिकेचे हित कश्यामध्ये आहे याची हे पहावे.

**सभापती** प्रभाग क्रं. 12 मध्ये रस्त्यांचे, नाली-नालेची साफसफाई होत नसल्यामुळे नागरीकांचे आरोग्यास धोका निर्माण झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी महानगरपालिकेची राहील. त्यामुळे प्रभाग क्रं. 12 मधील स्वच्छते बाबतीतची प्रशासनाने खालील प्रमाणे माहिती देण्यात आलेली आहे त्याची नोंद हि मनपा स्थायी समितीची सभा सर्वानुमते घेते. तसेच सादरकेल्या प्रमाणे मनपाकेच्या प्रत्येक प्रभागानिहाय माहिती संबंधीत प्रभागाच्या सर्व स. सदस्यांना दर महिण्याला स्वच्छतेची लेखी माहिती देण्यास हि मनपा स्थायी समितीची सभा सर्वानुमते मान्यता देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो. नियमानुसार आयुक्तांनी पुढील वैधानिक कार्यवाही करावी.

**ठराव क्रं. 121** **ठराव**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्यीत प्रभाग क्रं. 12 मध्ये रस्त्यांचे, नाली-नालेची साफसफाई होत नसल्यामुळे नागरीकांचे आरोग्यास धोका निर्माण झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी महानगरपालिकेची राहील. त्यामुळे प्रभाग क्रं. 12 मधील स्वच्छते बाबतीतची प्रशासनाने खालील प्रमाणे माहिती देण्यात आलेली आहे त्याची नोंद हि मनपा स्थायी समितीची सभा सर्वानुमते घेते.

प्र.क्रं. 12 अंतर्गत रस्त्यांची व नाले साफसफाईसाठी आवश्यक मनुष्यबळ व यंत्रसामुग्री बाबतची माहिती संबंधीत क्षेत्रीय कार्यालय क्रं. 05 इतवारा चे क्षेत्रीय अधिकारी व संबंधीत स्वच्छता निरिक्षक यांचेकडून प्राप्त करुन खालील प्रमाणे सादर करण्यात येत आहे.

| अ. क्रं. | रस्ते सफाईचे स्त्री मजुर | | | नाली व नाले सफाई पुरुष मजुर | | | ट्रॅक्टर | | घंटा गाडी | | सायकल रिक्षा | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | कंत्राटी | मनपा | एकूण | कंत्राटी | मनपा | एकूण | संख्या | मजुर | संख्या | मजुर | संख्या | मजुर |
| 01 | 08 | 04 | 12 | 05 | 05 | 10 | 01 | 04 | 04 | 04 | 01 | 01 |

1) प्र.क्रं. 12 मध्ये रस्ते साफसफाई करण्यासाठी एकूण 12 स्त्री मजुरांची संख्या आहे.

2) प्र.क्रं. 12 मध्ये नाली व नाले साफसफाई करण्यासाठी एकूण 10 पुरुष मजुरांची संख्या आहे.

3) प्र.क्रं. 12 मध्ये कचरा उचलण्यासाठी लावण्यात आलेले वाहने खालील प्रमाणे आहे :-

1) घंटा गाडी / अप्पे संख्या :- 04, वाहन चालकासह मजुर-08
2) रिक्षा संख्या :- 01, मजुर-01
3) ट्रॅक्टर :- 01, चालकासह मजूर-05
4) टेम्पो :- निरंक

मुद्दा क्रामंक 03 व 05 ची माहिती खालील प्रमाणे सादर करण्यात येत आहे.

| अ.क्र. | महिना | क्षेत्रीय कार्यालय क्रं. 05 इतवारा चे R & B चे प्रती माह वजन (टन) | क्षेत्रीय कार्यालय क्रं. 01 ते 06 अंतर्गत R & B चे प्रती माह वजन (टन) | महिना | क्षेत्रीय कार्यालय क्रं. 01 ते 06 अंतर्गत A2Z चे प्रती माह वाजन (टन) |
|---|---|---|---|---|---|
| 01 | फेब्रुवारी-18 | 659.475 | 1942.545 | फेब्रुवारी-16 | 7908.400 |
| 02 | मार्च-18 | 2940.385 | 8298.70 | मार्च-16 | 7914.555 |
| 03 | एप्रिल-18 | 2860.925 | 9569.180 | एप्रिल-16 | 7795.840 |
| 04 | मे-18 | 3482.415 | 10480.255 | मे-16 | 8152.610 |
| 05 | जुन-18 | 3036.655 | 8396.720 | जुन-16 | 10878.58 |
| 06 | जुलै-18 | 2950.755 | 8417.780 | जुलै-16 | 9298.185 |
| 07 | ऑगस्ट-18 | 2887.305 | 8094.055 | ऑगस्ट-16 | 7050.120 |
| 08 | सप्टेंबर-18 | 2691.210 | 7773.130 | सप्टेंबर-16 | 6996.625 |
| 09 | ऑक्टोंबर-18 | 2818.885 | 8066.925 | ऑक्टोंबर-16 | 7675.310 |
| 10 | नोव्हेंबर-18 | 2687.250 | 7865.315 | नोव्हेंबर-16 | 6267.800 |
| 11 | डिसेंबर-18 | 2663.780 | 8075.735 | डिसेंबर-16 | 5933.395 |
| 12 | जानेवारी-19 | -- | -- | जानेवारी-17 | 6065.225 |
| 13 | फेब्रुवारी-19 | -- | -- | फेब्रुवारी-17 | 6006.610 |
| 14 | मार्च-19 | -- | -- | मार्च-17 | 5382.735 |

तसेच वरील प्रमाणे मनपाकेच्या प्रत्येक प्रभागानिहाय माहिती संबंधीत प्रभागाच्या सर्व स. सदस्यांना दर महिण्याला लेखी माहिती देण्यास हि मनपा स्थायी समितीची सभा सर्वानुमते मान्यता देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो. नियमानुसार आयुक्तांनी पुढील वैधानिक कार्यवाही करावी.

**विषय क्रं. 06** **प्रस्ताव**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका पभाग क्रं. 06 श्रीनगर भागात जमदाडे यांचे घर ते देशपांडे यांच्या घरा पर्यंत 25 वर्षापासुन पाण्याची पाईपलाईनच नाही तसेच या भागात जुनी चिनीमातीची 4 इंचीची लाईन आहे ती वेळोवेळी ब्लॉक होत आहे त्यामुळे घाण पाणी रस्त्यावर येऊन नागरीकांच्या आरोग्यास धोका निर्माण होत आहे. या बाबत नागरीकांची वारंवार तक्रार आहे. सदरहु ठिकाणी 150 एमएम व्यासाची पाईप लाईन टाकणे आवश्यक आहे तरी या अत्यंत आवश्यक आणि तातडीच्या कामावरील लागणा-या खर्चास ही स्थायी समितीची सभा सर्वानुमते मान्यता देते.

**सुचक** :- राजेश लक्ष्मीनारायण यन्नम **अनुमोदक** :- मसुद अहेमद खान

**राजेश यन्नम** श्री जमदाडे व श्री देशपांडे यांच्या घरासमोरुन गेल्या 25 वर्षापासुन पाईप लाईन कार्यकारी अभियंता यांना ती गल्ली कोठे आहे हे सांगावे. त्यासाठी या गल्लीत अमृत योजनेत पाण्याची लाईन टाकावी.

**सभापती** राजेश यन्नम यांच्या वार्डातील श्री जमदाडे यांच्या घराच्या समोरच्या रस्त्यावर अमृत योजनेअंतर्गत पाण्याची लाईनची पहाणी कार्यकारी अभियंता करावी. लहान लहान कामे त्वरीत पुर्ण करुन दयावे.

**मोहिनी येवनकर** 14 व्या वित्त आयोगाचा निधी कोणत्या शिर्षकावर खर्च करण्याचे काय निकष काय आहेत. हा निधी योग्य प्रकारे खर्च झाला नाही तर त्याची जबाबदारी ही कोणाची आहे याची सविस्तर माहिती सभागृहात दयावी.

**राजेश यन्नम** 14 व्या वित्त आयोगाचा निधीचा दुरुपयोग केला जात आहे. या पुर्वी एक धनादेश या आयोगाच्या निधीतुन दिलेला आहे अशी माहिती माझ्याकडे आहे.असे धनादेश देणे चुक आहे. ज्या अधिका-याने हा निधीचा धनादेश दिला आहे त्याच्या बाबतचा विषय सभागृहाने ठेवून तो त्याच्यावर कार्यवाही करण्यात यावी. रस्ता अनुदानात सुध्दा खर्च असाच खर्च केलेला आहे त्यास कोण जबाबदार आहे त्यांच्यावरही कार्यवाही करावी.

**आयुक्त** घनकच-याचे सकंलन, वाहतुक, प्रक्रीया यावर आपण खर्च करु शकतो. वैयक्तीक शौचालय यावरही खर्च करता येतो व नागरी वनीकरण या शिर्षकावर खर्च करता येवू शकते.

**मुख्यलेखा परिक्षक** 14 व्या वित्त आयोगाच्या निधीतुन घन कच-यावर 11.82 लक्ष रुपये खर्च झालेला आहे, सामाजिक वनीकरण या शिर्षकात रु 6.14 लक्ष खर्च करण्यात आला आहे.लोनचे पेमेंट करण्यासाठी रु.12 कोटीचा निधी खर्च केलेला आहे. आतापर्यत रु. 145.37 लक्ष एवढा खर्च झालेला आहे.

**अब्दुल शमीम** आपल्याकडे कचरा संकलन करण्याची एजन्सी फीक्स आहे, नालीतील गाळ काढण्यासाठी हा निधी का खर्च करण्यात आला. वेगळा निधी का देण्यात आला.

**उप आयुक्त प्रशासन** पावसाळा पुर्व नाले सफाईचे काम कंपनीच्या स्कोपमध्ये येत नाही.

**अब्दुल शमीम** 14 व्या वित्त आयोगाचा निधी पावसाळापुर्व नाले सफाईसाठी टाकण्याची आवश्यकता नव्हती. तो निधी कसा काय देण्यात आला आहे. मनपा निधी मधुन त्याचे पेमेट करणे आवश्यक होते. आजपर्यत ते पैसे टाकले होते काय याचा खुलासा करावा. रु. 60 लक्षाचा निधी दिलेला आहे. नाले सफाई योग्य पध्दतीने झालेली नाही. 14 व्या वित्त आयागोचा निधी खर्च करण्यासाठी स्थायी समितीची किंवा सर्वसाधारण सभेची मान्यता घेतली काय हे दाखवावे. सभागृहात फाईल मागविण्यात यावी.

**राजेश यन्नम** नाले सफाई सादीक साहेबांनी योग्य रितीने केलेली नाही आताही नाली मध्ये तसाच कचरा पडून आहे त्यामुळे त्यांना या विभागातून बदली करावी. रोड ग्रॅडचा निधी सुध्दा इतरत्र वळविण्यात आला आहे. ही संचिका मागविण्यात यावी.

**फारुक बदवेल** उन्हाळा येत आहे त्यासाठी काय उपाय योजना केली आहे नविन बोर, हात पम्प दुरुस्त केले काय यावर्षी पाण्याची टंचाई भासणार आहे.

**उप आयुक्त प्रशासन** 280 फुटापेक्षा जास्त आपण बोर मारु शकत नाही आणि 280 फुटापर्यत पाणी लागत नाही. बोर मारता येणार नाहीत.बील / एमबी आम्ही 280 पर्यतच फुटापर्यत बनविता येते त्यावर एमबी रेकॉर्ड तयार करता येणार नाही.

**सभापती** पावसाळयात पाणी टंचाई भासणार नाही यासाठी प्रशासनाने उपाय योजना करावी. स. सदस्यांचा प्रस्ताव मंजुर करण्यात येते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो. नियमानुसार आयुक्तांनी पुढील वैधानिक कार्यवाही करावी.

**ठराव क्रं. 122** **ठराव**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका पभाग क्रं. 06 श्रीनगर भागात जमदाडे यांचे घर ते देशपांडे यांच्या घरा पर्यंत 25 वर्षापासुन पाण्याची पाईपलाईनच नाही तसेच या भागात जुनी चिनीमातीची 4 इंचीची लाईन आहे ती वेळोवेळी ब्लॉक होत आहे त्यामुळे घाण पाणी रस्त्यावर येऊन नागरीकांच्या आरोग्यास धोका निर्माण होत आहे. या बाबत नागरीकांची वारंवार तक्रार आहे. सदरहु ठिकाणी 150 एमएम व्यासाची पाईप लाईन टाकणे आवश्यक आहे तरी या अत्यंत आवश्यक आणि तातडीच्या कामावरील लागणा-या खर्चास ही स्थायी समितीची सभा सर्वानुमते मान्यता देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो. नियमानुसार आयुक्तांनी पुढील वैधानिक कार्यवाही करावी.

**विषय क्रं. 07** **प्रस्ताव**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेस 14 व्या वित्त आयोगातुन एकूण किती निधी प्रराप्त झाला निधी वित्त आयोगाचे निकष काय होते तसेच प्राप्त निधीपैकी खर्च किती झाला व शिल्लक किती याची सविस्तर माहिती प्रशासनाने सभ्ज्ञागृहासमोर ठेवुन त्यावर चर्चा करुन निर्णय घेण्यास ही मनपा स्थायी समितीची सभा सर्वानुमते मान्यता देते.

**सुचक** :- मोहिनी विजय येवनकर **अनुमोदक** :- फारुख बदवेल

**अ. शमीम अब्दुल्ला** महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन निर्णय क्रं. टिएफसी 8015/प्र.क्र.106/नवि-4 मंत्रालय मुंबई दिनांक 03.08.2015 च्या शासन निर्णयातील (II) (i) मध्ये मुलभुत अनुदानातुन कोणते कामे घेता येते तसेच सदरील शासन निर्णयातील (III) (आ) (2) नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेने सर्वसाधारण सभेच्या ठरावान्वये संबंधीत कामाची शिफारस केली असावी असा उल्लेख आहेत. तसेच मध्ये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम 63 मध्ये आवश्यक कर्तव्यांकरिता अनुदानातुन प्राप्त निधितुन हाती घ्यावयाचे कामे बाबत निर्देश देण्यात आलेले असुन सदरील शासन निर्णय अथवा मनपा अधिनियमातील उक्त तरतुदी मध्ये शहरातील नाले साफसफाई करण्याचा कोठेही उल्लेख करण्यात आलेला नाही.

प्रशासनाने मे. अबचल इन्फ्रास्ट्रक्चर नांदेड या कंत्राटदाराने पावसाळया पुर्व नाले साफसफाई सालसन 2018-19 साठी पुरवठा करण्यात आलेल्या पोकलेन 200, जेसीबी-80, व टिप्परचे पुरवठा केल्यामुळे संबंधीत कंत्राटारास देयक रु. 56,82,478/- हे शासनाने सालसन 2018-19 च्या 14व्या वित्त आयोगाच्या निधीतुन अदाई केलेले आहे.

सदर मे. अबचल इन्फ्रास्ट्रक्चर नांदेड कंत्राटारास 14व्या वित्त आयोगातुन वरील रक्कम देता येते किंवा कसे या बाबत मुख्यलेखा परिक्षक यांनी शासन निर्णय दि. 03.08.15 व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम 63 नुसार अभिप्राय न देता फक्त स्वाक्ष-या केल्यामुळे सर्व अधिका-यांनी संबंधीत कंत्राटदारास देयक अदाई करण्यास मान्यता दिल्याचे सिध्द झालेले आहे. करिता उक्त शासन निर्णय व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचा उल्लंघन करणा-या सर्व अधिका-यांवर शिस्तभंग विषयक कार्यवाही करण्यास अथवा संबंधीत कंत्राटदारास चुकीच्या पध्दतीन अदाई करण्यात आलेल्या देयके हे सर्व संबधीत अधिका-यांच्या पगारातुन कपात करुन घेवुन मनपा फंडात जमा करुन घेण्यास मान्यता देण्यात यावी.

**मोहिनी येवनकर** श्री अ. शमीम यांनी जो दुरुस्ती प्रस्ताव मांडला त्यास माझे अनुमोदन आहे.

**सभापती** श्री अ. शमीम यांनी जो दुरुस्ती प्रस्ताव मांडला त्यास मान्यता देण्यात येते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो. नियमानुसार आयुक्तांनी पुढील वैधानिक कार्यवाही करावी.

**ठराव क्रं. 123** **ठराव**

महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन निर्णय क्रं. टिएफसी 8015/प्र.क्र.106/नवि-4 मंत्रालय मुंबई दिनांक 03.08.2015 च्या शासन निर्णयातील (II) (i) मध्ये मुलभुत अनुदानातुन कोणते कामे घेता येते तसेच सदरील शासन निर्णयातील (III) (आ) (2) नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेने सर्वसाधारण सभेच्या ठरावान्वये संबंधीत कामाची शिफारस केली असावी असा उल्लेख आहेत. तसेच मध्ये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम 63 मध्ये आवश्यक कर्तव्यांकरिता अनुदानातुन प्राप्त निधितुन हाती घ्यावयाचे कामे बाबत निर्देश देण्यात आलेले असुन सदरील शासन निर्णय अथवा मनपा अधिनियमातील उक्त तरतुदी मध्ये शहरातील नाले साफसफाई करण्याचा कोठेही उल्लेख करण्यात आलेला नाही.

प्रशासनाने मे. अबचल इन्फ्रास्ट्रक्चर नांदेड या कंत्राटदाराने पावसाळया पुर्व नाले साफसफाई सालसन 2018-19 साठी पुरवठा करण्यात आलेल्या पोकलेन 200, जेसीबी-80, व टिप्परचे पुरवठा केल्यामुळे संबंधीत कंत्राटारास देयक रु. 56,82,478/- हे शासनाने सालसन 2018-19 च्या 14व्या वित्त आयोगाच्या निधीतुन अदाई केलेले आहे.

सदर मे. अबचल इन्फ्रास्ट्रक्चर नांदेड कंत्राटारास 14व्या वित्त आयोगातुन वरील रक्कम देता येते किंवा कसे या बाबत मुख्यलेखा परिक्षक यांनी शासन निर्णय दि. 03.08.15 व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम 63 नुसार अभिप्राय न देता फक्त स्वाक्ष-या केल्यामुळे सर्व अधिका-यांनी संबंधीत कंत्राटदारास देयक अदाई करण्यास मान्यता दिल्याचे सिध्द झालेले आहे. करिता उक्त शासन निर्णय व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचा उल्लंघन करणा-या सर्व अधिका-यांवर शिस्तभंग विषयक कार्यवाही करण्यास अथवा संबंधीत कंत्राटदारास चुकीच्या पध्दतीन अदाई करण्यात आलेल्या देयके हे सर्व संबधीत अधिका-यांच्या पगारातुन कपात करुन घेवुन मनपा फंडात जमा करुन घेण्यास ही मनपा स्थायी समितीची सभा सर्वानुमते मान्यता देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो. नियमानुसार आयुक्तांनी पुढील वैधानिक कार्यवाही करावी

**विषय क्रं. 08** **प्रस्ताव**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका वार्ड विकास निधी (स्वेच्छा निधी) अंतर्गत या आर्थीक वर्षात कोण कोणती कामे करण्यात आली याची सविस्तर माहिती सभागृहासमोर ठेवण्यास हि मनपा स्थायी समितीची सभा सर्वानुमते मान्यता देते.

**सुचक** :- अ. शमीम अब्दुल्ला साब **अनुमोदक** :- अ. लतीफ अ. मजीद

**नगरसचिव** प्रशासकीय टीप्पणीप्रमाणे 33 सदस्यांच्या कामाचे वर्क ऑर्डर दिलेले आहे.

**सभापती** स्वेच्छा निधीचे कामे ही वेळेत केली पाहीजे कारण आता मार्च एन्ड येत आहे.

**कार्यकारी अभियंता सांबावि** 33 सदस्यांचे वर्क ऑर्डर दिलेली आहे उर्वरीत सदस्यांचे कामे ही निविदा प्रक्रीयेत आहेत त्यास त्वरीत मान्यता देण्यात येईल.

**सभापती** स्वेच्छा निधीचे कामे पेडींग ठेवण्यात येवू नये. मागील सहा महीण्यापासुन मी पत्र दिले आहे आतापर्यंत कामास मान्यता अप्राप्त आहे. मार्च नंतर कामे रदद करण्यात येतात ती कामे रदद होवू देणार नाही. रु.10 लक्षाची कामे प्रत्येक प्रभागात काढली पाहीजे.

**कार्यकारी अभियंता सांबावि** सर्व कामे दोन दिवसात पुर्ण करुन घेण्यात येईल.

**अब्दुल शमीम** मार्च अखेर येण्यासाठी केवळ 1 महीण्याचा कालावधी शिल्लक आहे. ही कामे कधी सुरु होतील आणि या कामे पुर्ण कधी होतील. जानीवपुर्वक कामे थांबविण्यात येत आहेत. एक वर्ष झाले आपण कामे का काढत नाही.

**कार्यकारी अभियंता सांबावि** डीएसआर बदल झाल्यामुळे वेळ लागत आहे.

**अब्दुल शमीम** डिएसआर बदल झाला असेल तर एका फाईलला लावला म्हणजे सर्वांना लागु होतो. आजच्या आज सर्व फाईल पुर्ण करुन घ्यावे.

**अब्दल रशिद/राजेश यन्नम** फाईल कदम साहेबांकडे थांबत नाही फाईल ही दुस-या विभागात थांबत आहे. फाईल ही दक्षता विभागात थांबत आहे. दक्षता विभाग बंद करण्यात यावा.

**आयुक्त** दक्षता विभागात स्वेच्छा निधीच्या फाईल आजच्या आज क्लीअर करुन घेण्यात येतील.

**भानुसिंग रावत** स्वेच्छा निधीची फाईल ही दक्षता कमीटीस जाणार नाही असे आदेश निर्गमीत करावे. आवश्यक कामच आम्ही सागत आहोत ती कामे झाले पाहीजे.

**अब्दुल शमीम** स्वेच्छा निधीचे पैसे गुतेदारास त्वरीत मीळाले पाहीजे त्यासाठी ते पैसे वेगळे खात्यात जमा ठेवावे. स्वेच्छा निधीचे काम करण्यात गुतेदार तयार रहातील.

**आयुक्त** ज्या सदस्यांने रु. 10 लक्षाच्या चीठठी दिली आहे त्यांचे बिल वेळेवर मिळणार नाही ज्यांनी चिठठी दिली नाही त्यांची बील त्वरीत काढण्यात येतील.

<u>कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग यांचा अभिप्राय</u>

नगरसेवक स्वेच्छा निधी अंतर्गत प्रस्तावित कामांचा तपशील दिनांक 29.01.2019 पर्यंतची स्थिती खालील प्रमाणे आहेत

| प्रशासकीय व आर्थीक मान्यता प्राप्त कामे | निविदा काढण्यात आलेली कामे | निविदा मंजुर | कार्यारंभ आदेश दिलेले कामे |
|---|---|---|---|
| 66 | 53 | 25 | 33 |

**सभापती** ज्या स. सदस्यांच्या स्वेच्छा निधीची कामे अद्याप निघालेले नाही अशा सर्व सदस्यांच्या स्वेच्छा निधीच्या कामाची निविदा अंतीम करण्यात यावी

**ठराव क्रं. 124** **ठराव**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका वार्ड विकास निधी (स्वेच्छा निधी) अंतर्गत शिल्लक असलेल्या स. सदस्यांच्या प्रभागाच्या कामे तात्काळ निविदा काढून कार्यारंभ आदेश देण्यास हि मनपा स्थायी समितीची सभा सर्वानुमते मान्यता देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो. नियमानुसार आयुक्तांनी पुढील वैधानिक कार्यवाही करावी.

**विषय क्रं. 09** **प्रस्ताव**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्यीत करबला कब्रस्तान व बारा इमाम मन्यार गल्लीची संचिका गेल्या पाच-सहा महिण्यापासुन प्राथमिक मान्यता करीता संचिका आता पर्यंत झाली नाही तरी तात्काळ संचिका मान्य करावी अन्यथा रद्द करावी.

**सुचक** :- अब्दुल शमीम अब्दुल्ला **अनुमोदक**:- अ. लतीफ अ. मजीद

**कार्यकारी अभियंता सांबावि** भिंतीचे बांधकाम करण्याची संचिका ही मालमत्ता विभागास पाठविली असता त्यांनी त्यावर वक्क बोर्डाची मान्यता घेण्यात यावी असे पृष्ठांकन केले आहे त्यामुळे तसा पत्र व्यवहार करण्यात आला आहे.

**अब्दुल शमीम** जाणीवपुर्वक कामे थांबविण्यात येत आहेत आतापर्यत वक्क बोर्डाची मान्यता घेण्यात आली नाही आताच घेण्याची का आवश्यकता पडत आहे याचा खुलासा करावा. आवार भींतीचे काम करीत आहोत. त्या ठिकाणी इमारतीचे बांधकाम करीत नाही. काम रदद करावयाचे नसल्यास रदद करावे.

**सभापती** वक्क बोर्डाची मान्यता घेण्यात आली नाही त्यामुळे या नंतर ती मान्यता घेण्यात येवू नये.कब्रस्थानचे काम आहे. ते त्वरीत करावे.

**आयुक्त** कब्रस्थानचे काम त्वरीत सुरु करावे यात विलंब होणार नाही याची विभाग प्रमुखांने काळजी घ्यावी. वर्कऑर्डर देवून काम चालू करावे.

**फारुक बदवेल** वक्क बोर्डाने आतापर्यत कधी आक्षेप नोंदविला आहे काय हे सांगावे. आताच वक्क बोर्डाकडे का आपण गेलो आहे. पत्रव्यवहार करण्याची गरज नव्हती.

**सभापती** स. सदस्यांचा प्रस्ताव मंजुर करण्यात येते तसेच शहरातील इतरही कब्रस्तान विकसीत करण्याच्या कामांची निविदा अंतीम करुन तात्काळ कामे करण्यास मान्यता देण्यात येते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो. नियमानुसार आयुक्तांनी पुढील वैधानिक कार्यवाही करावी.

**ठराव क्रं. 125** **ठराव**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्यीत करबला कब्रस्तान व बारा इमाम मन्यार गल्लीची संचिका गेल्या पाच-सहा महिण्यापासुन प्राथमिक मान्यता देण्यास हि मनपा स्थायी समितीची सभा सर्वानुमते मान्यता देते. शहरातील इतर ही कब्रस्तान येथील शिल्लक असलेले कामे त्वरीत करण्यास ही मनपा स्थायी समितीची सभा सर्वानुमते मान्यता देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो. नियमानुसार आयुक्तांनी पुढील वैधानिक कार्यवाही करावी.

**विषय क्रं. 10** **प्रस्ताव**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकाक हद्यीत प्रभाग क्रं. 10 मुख्य रस्त्यापासुन श्री साहेबराव केरबाजी कल्याणकर यांचे घर ते श्री गणलोवर यांच्या घरा पर्यंत सी.सी. रस्ता करणे आवश्यक आहे करिता या कामावरील लागणा-या खर्चास ही स्थायी समितीची सभा सर्वानुमते मान्यता देते.

**सुचक** :- सौ. ज्योती किशण कल्याणकर **अनुमोदक** :- राजु यन्नम

**अब्दुल शमीम** आपल्याकडे एक सहाय्यक आयुक्त होते त्यांचे निधन झाले. त्यांच्या वारसास नौकरीवर लवकरात लवकर घ्यावे. इतरही काही कर्मचारी यांचे पाल्याचे नौकरीवर घेण्याचा विषय असेल तर तो घेण्यात यावा. फाईल फीरुवू नये.

**सभापती** ज्या कर्मचा-याचे निधन झाले त्यांच्या पाल्यांना नौकरीवर त्वरीत घेण्यात यावे.

**सौ ज्योती कल्याणकर** माझ्या प्रस्ताव असुन सदरच्या प्रस्तावा प्रभाग क्रं. 10 झालेला असुन त्या ऐवजी प्रभाग क्रमांक 01 असा दुरुस्ती करुन त्यास मान्यता देण्यात यावी व हा ठराव याच सभेत कायम करण्यात यावा.

**सभापती** स. सदस्यांची सुचविल्यानुसार प्रस्तावात दुरुस्ती करुन सदरचा प्रस्ताव मंजुर करण्यता येते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो. नियमानुसार आयुक्तांनी पुढील वैधानिक कार्यवाही करावी.

**ठराव क्रं. 126** **ठराव**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकाक हद्दीत प्रभाग क्रं. 01 मुख्य रस्त्यापासुन श्री साहेबराव केरबाजी कल्याणकर यांचे घर ते श्री गणलोवर यांच्या घरा पर्यंत सी.सी. रस्ता करण्यासाठी लागणा-या खर्चास ही स्थायी समितीची सभा सर्वानुमते मान्यता देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो. नियमानुसार आयुक्तांनी पुढील वैधानिक कार्यवाही करावी.

**विषय क्रं. 11** **अपिल** **दिनांक 20.12.2018**

**वाचा :-** मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 56(4) मधील तरतुदीनुसार अपिल

**प्रति,**

**मा. सभापती,**

**स्थायी समिती,**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नांदेड

कार्यालयीन आदेश क्रं. नावाशमनपा/साप्रवि/आस्था-4/9721/18 दि. 11.10.2018 च्या आदेशा विरुध्द अपिल

**अपिलार्थी** :: संभाजी माधवराव कास्टेवाड जकात अधिक्षक (कार्यालय अधिक्षक) क्षे.का. क्रं. 2 मनपा नांदेड

हे की, वरील आदेशा विरुध्द खालील प्रमाणे मा. सभापती महोदयांचे न्यायालयात अपिल सादर करीत आहे. हे की, मी आपल्या कार्यालयात 24 वर्षा पासुन सेवेत लिपीक, वरिष्ठ लिपीक, कार्यालय अधिक्षक या पदावर काम केलेले असुन या व्यतिरिक्त जकात निरीक्षक, इमारत निरीक्षक, स्थानिक संस्था कर निरीक्षक अशा अनेक पदावर काम केलेले असुन आता पर्यंत मला सोपविण्यात आलेली कामे तत्परतेने करुन आपल्या कार्योलयाकडून जकात विभागात जकात चोरी पकडून कार्यालयाकडून बक्षीस प्राप्त केलेले आहे तसेच स्थानिक संस्था कर विभागात असतांना पथकामध्ये काम करुन अनारॉईड मोबाईल बक्षीस स्वरुपात कार्यालयाकडून मिळविलेला आहे व कर्तव्यात कधीही निष्काळजीपणा व कसुर केलेला नाही व या बाबत कार्यालयाकडून कोणतीही नोटीस देण्यातआलेली नाही.

सार्वजनिक सुट्टीच्या काळात मुख्यालयात उपस्थितराहण्याचा आदेश न देताच दिनांक 12.11.2016 ते 14.11.2016 या सार्वजनिक सुट्टीच्या काळात मुख्यालयाची चौकशी न करता व कसल्याही प्रकारची नोटीस न देता कार्यालयीन आदेश क्रं. नावाशमनपा/क्षेका.ब/1910/2016 दिनांक 14.11.2016 रोजी महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) 1979 चा नियम 8(1) अन्वये शिस्तभंगाची कार्यवाही खालील दोषारोप लावून निलंबीत करण्यताआलेले आहे.

**जोडपत्र-1** 1) कामात निष्काळजीपणा करणे

2) कर्तव्यात कसुर करुन महत्वाचे कार्यालयीन कामाचे वेळेस विनापरवानगी कार्यालय सोडणे. जोडपत्र-2 अन्वये (विस्ताराने) विवरण प्रमाणे.

1- **<u>कामात निष्काळजीपणा करणे :-</u>** मला मा. आयुक्त साहेबांनी वरिष्ठ लिपीक या पदावरुन जकात अधिक्षक या पदावर पदोन्नती देवुन कार्यालयीन आदेश क्रं. नावाशमनपा/साप्रवि/आस्था-1/1087/16 दिनांक 27.04.2016 अन्वये क्षेत्रीय कार्यालय-ब स्टेडीयम मनपा नांदेड येथे कार्यालय अधिक्षक या पदावर पदस्थापना करण्यात आली होती.

सदर आदेशानुसार सहाय्यक आयुक्त (श्री अविनाश अटकोरे) यांनी मला कार्यालय अधिसक्षक या पदावर रुजु करुन घेवुन मरा. आयुक्त यांच्या आदेशाचे पालन न करता मा. आयुक्त यांनी दिलेले कार्यालय अधिक्षक या पदाचे काम न देता मला माझे पदाचे हक्कापासुन वंचीत ठेवुन माझ्या पदापेक्षा कनिष्ठ पदावर असलेले वरिष्ठ लिपीक श्री जमील अहेमद यांना कार्यालय अधिक्षकाचे काम देवुन त्यांचे हाताखाली कर निरीक्षकाचे कनिष्ठ पदाचे अपमानकारक व नियमबाह्य काम दिलेले होते. असे असतांनाही मी माझी पदाला न्याय मिळण्यासाठी मा. आयुक्त साहेब यांच्याकडे मागणी चालु ठेवुन सहाय्यक आयुक्त यांनी दिलेले आदेशाचे पालन करुन कर निरीक्षकाचे काम केलेले आहे त्या काळात माझ्या अधिन असलेले वसुली लिपीक श्री गाडे, श्री चामे व सोनसळे यांची वसुली चांगली असल्यामुळे सदर काळात मला वसुली कमी कअसल्याबाबत किंवा कामात निष्काळजीपणा केल्या बाबत कसलीही नोटीस किंवा अनुपस्थित असल्याबाबत पत्र देण्यात आलेले नाही त्यामुळे मला लावण्यातआलेला दोष चुकीचा असुन चौकशी अधिकारी यांनी हा दोष अंशतः असल्याचे चौकशी अहवाल दिल्याचे सांगितले आहे तो दोष रद्दबातल करण्यात यावा जे की माझ्यावर अन्याय कारक आहे.

तसेच दोषारोप क्रं. 2 :- मधील अटीबाबत मला निलंबीत करण्यात आले होते तो दोषारोप सिध्द होत नाही असा चौकशी अहवाल चौकशी अधिकारी यांनी सादर केलेला असल्यामुळे माझा निलंबन काळा व कर्तव्यकाळ करणे आवश्यक आहे असे असतांना देखील माझा निलंबन कालावधी निलंबन काळ करुन माझ्यावर ठपका ठेवुन तसेच सार्वजनिक सुट्टीच्या कालावधीचा पगार कपात करुन माझ्यावर अन्याय केला आहे तेंव्हा माझा निलंबन कालावधी हा कर्तव्यकाळ गृहीत धरण्यात यावा माझ्यावर ठेवलेला ठपका रद्दबातल करण्यता यावा तसेच सार्वजनिक सुट्टी दिनांक 12.11.2016 ते 13.11.2016 चा पगार देण्यात यावा.

**<u>विनंती</u>**

माझे अपिल मंजुर करण्यात यावे सदर दोषारोप चौकशी अधिकारी यांनी चौकशीत लावण्यात आलेला दोषारोपव सिध्द होत नसल्याचा अहवाल दिला असल्यामुळे दिनांक 14.11.16 ते 07.03.17 (114) दिवसांचा निलंबन काळ हा कर्तव्यकाळ गृहीत धरण्यता यावा व दि. 12.11.16 ते 13.11.16 या सार्वजनिक सुट्टीच्या काळाची अनुपस्थिती देण्यात आलेली होती ती उपस्थिती मान्य करुन त्याचा पगार देवून माझ्यावर ठेवण्यात आलेला ठपका रद्दबातल ठरविण्यता यावा अशी विनंती आहे

**अपिलार्थी**

**स्वाक्षरीत/-**

**संभाजी माधवराव कास्टेवाड क्षे.का.क्रं.2 मनपा नांदेड**

**प्रशासकीय अहवाल**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका क्षेत्रीय कार्यालय क्रं. ब अशोकनगर येथे संबंधीत हे कार्यरत असतांना नोट बंदीच्या काळात वसुली कामात निष्काळजीपणा, कर वसुली कामात उपस्थित न राहणे तसेच उपस्थित पटावर स्वाक्षरी करुन अनुपस्थित राहिल्यामुळे क.आ. क्रं. नावाशमनपा/क्षेकाब/1910/16 दिनांक 14.11.16 अन्वये संबंधीतास निलंबीत करण्यात आले होते. तदनंतर का.आ. क्रं. नावाशमनपा/आस्था-4/16712/17 दिनांक 08.03.17 अन्वये संबंधीतास चौकशीच्या अधिन राहुन कामावर पुनस्थापित करण्यात आले आहे.

त्यानुसार संबंधीता विरुध्द विभागीय चौकशी आरंभविण्यात आलेली होती सदरच्या चौकशी अंती चौकशी अधिका-यांनी दिनांक 03.05.18 रोजी अहवाल सादर केलेला असुन सदरील चौकशी अहवालानुसार दोषारोप क्रं. 01 हा अंशतः सिध्द होतो व दोषारोप क्रं. 02 सिध्द होत नाही असा चौकशी अहवाल सादर केलेला आहे.

चौकशी अहवालाच्या अनुषंगाने संबंधीता विरुध्द ठेवण्यात आलेला दोषारोप क्रं. 01 हा अंशतः सिध्द होत असल्यामुळे का.आ.क्रं. नावाशमनपा/साप्रवि/आस्था-4/9721/18 दि. 11.10.18 अन्वये संबंधीताची दिनांक 14.11.16 ते 07.03.17 पर्यंत (114) दिवसाचा निलंबन कालावधी हा निलंबन काळ गृहीत धरण्यात आला तसेच महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपिल) 1979 चे नियम 5(1) मधील तरतुदीनुसार कामात निष्काळजीपणा केल्याचा ठपका ठेवण्यात आलेला आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम 56(4) नुसार कोणत्याही अधिका-यास / कर्मचा-यास जबर शास्ती लादलेली असेल, शास्ती लादलेला आदेश कळवल्यापासुन एक महण्याच्या आत ज्या प्राधिका-यांने शास्ती लादली असेल त्याच्या निकट वरिष्ठ प्राधिका-याकडे अपिल करण्याची तरतुद आहे.

तथापि, संबंधीतास किरकोळ स्वरुपाची शास्ती लादलेली आहे तसेच संबंधीतांनी वरिष्ठ प्राधिकरणाकडे एक महिण्याच्या आत अपिल केलेले नाही त्यामुळे संबंधीतास लादलेली शास्ती ही किरकोळ स्वरुपाची असल्याने ती रद्द किंवा त्यात बदल करता येणार नाही.

**सभापती** श्री संभाजी कास्टेवाड यांनी का.आ.क्रं. नावाशमनपा/साप्रवि/आस्था-4/9721/18 दि. 11.10.18 अन्वये दिनांक 14.11.16 ते 07.03.17 पर्यंत (114) दिवसाचा निलंबन कालावधी हा निलंबन काळ गृहीत धरण्यात आला असुन सदरचा 114 दिवसाचा निलंबन कालावधी हा कर्तव्यकाळ धरण्या बाबत केलेली अपिल हि मनपा स्थायी समितीची सभा सर्वानुमते मंजुर करते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो. नियमानुसार आयुक्तांनी पुढील वैधानिक कार्यवाही करावी.

**ठराव क्रं. 127** **ठराव**

श्री संभाजी माधवराव कास्टेवाड, कार्यालय अधिक्षक क्षे.का.क्रं. 2 मनपा नांदेड यांनी कामत निष्काळजीपणा केल्यामुळे संबंधीतास प्रशासनाने का.आ.क्रं. नावाशमनपा/साप्रवि/आस्था-4/9721/18 दि. 11.10.18 अन्वये दिनांक 14.11.16 ते 07.03.17 पर्यंत (114) दिवसाचा निलंबन कालावधी हा निलंबन काळ गृहीत धरण्यात आला असुन सदरचा 114 दिवसाचा निलंबन कालावधी हा कर्तव्यकाळ धरण्या बाबत केलेली अपिल हि मनपा स्थायी समितीची सभा सर्वानुमते मंजुर करते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो. नियमानुसार आयुक्तांनी पुढील वैधानिक कार्यवाही करावी.

**सभापती** आजच्या सभेचे कामकाज संपल्यामुळे सदरची सभा संपल्याचे जाहिर करण्यात येते.

| | |
|---|---|
| **स्वाक्षरीत/-** | **स्वाक्षरीत/-** |
| **(स. अजीतपालसिंघ संधु)** | **(खान फारुख अली इलीयाज खान)** |
| **नगरसचिव,** | **सभापती,** |
| नांवाशमनपा, नांदेड. | **स्थायी समिती,** मनपा नांदेड |